


RNI NO-MAHMAR/2022/90217

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे | अंक : ३९ वा | मंगळवार | दि. ११ मार्च २०२५ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# बोथेंवर चल अचल संपत्ती जप्त व लिलाव करून येणारा पैसा शासन जमा करून फौजदारी कारवाईसाठी डॉ. भंडारी यांचे हात थरथर करताहेत का?

## प्रकाश नामदेव बोथे म्हणजे चोर आणि वरून शिरजोर या उक्तीप्रमाणे वागणारे मुजोर व्यक्तिमत्व

**जनसंचलन/बुलढाणा**

चौकशी समितीत दोषी आढळलेल्या व तात्काळ फौजदारी कारवाईची गरज असलेल्या प्रकाश नामदेव बोथे राहणार अकोला यांच्यावर गेल्या अनेक महिन्यांपासून आरोग्य उपसंचालक अकोला डॉ. कमलेश भंडारी यांचे हात थरथरत आहेत का, असा महत्वपूर्ण प्रश्न आता उपस्थित होऊ लागला आहे. प्रकाश नामदेव बोथे हल्ली मुक्काम अकोला गोरक्षण रोड परीसर अकोला यांच्यावर जी विभागीय चौकशी बसवण्यात आली होती, त्या अहवालात अत्यंत गंभीर असे निष्कर्ष समोर आलेले आहेत. त्यामुळे प्रकाश नामदेव बोथे ही आरोग्य विभागाला लागलेली भ्रष्टाचाराची कीड आहे, हे सिद्ध होते. असे असताना देखील प्रकाश बोथे चौकशी समितीशी अत्यंत असहकार करीत आपली मुजोरी सिद्ध केली आहे. यानुसार एकच म्हणावेसे वाटते की, प्रकाश नामदेव बोथे हे मचोर...आणि वरून शिरजोरफ या उक्तीप्रमाणे वागणारे मुजोर व्यक्तिमत्व आहे. सन २०१९ साली भांडारपाल या पदावर शैक्षणिक पात्रता आणि बौद्धिक लायकी नसताना देखील प्रकाश बोथे हे कार्यरत झाले. अर्थात, बोथे यांना या पदावर नियुक्ती देणाऱ्या अधिकाऱ्यावर देखील गंभीर स्वरूपाची कारवाई होणे गरजेचे आहे. कारण नियमात बसत नसतानाही करण्यात आलेली ही नियुक्ती नक्कीच अर्थपूर्ण देवाणघेवाण झाल्याशिवाय झालेली नाही, हे सिद्ध आहे. भांडारपाल पदावर कार्यरत झाल्यानंतर बोथे यांनी भ्रष्टाचाराची एक अनंत अशी मालिका सुरू केली. प्रत्येक ठिकाणी भ्रष्टाचार करीत मोठ्या प्रमाणात जिल्हा रुग्णालयाला चुना लावण्याचे काम केले. प्रकाश नामदेव बोथे यांनी कशाकशात भ्रष्टाचार केला हे आम्ही पुढच्या अंकात आम्ही सविस्तररित्या मांडले आहे. आता मुद्दा हा आहे की, बोथे यांची तक्रार झाल्यानंतर आणि यासंदर्भात चहूबाजूंनी दबाव आणला गेल्यानंतर अखेर बोथे यांची विभागीय चौकशी करण्यात आली.या विभागीय चौकशी दरम्यान स्वतःची बाजू मांडण्यासाठी बोथे यांना बोलावणे पाठवण्यात आले होते. परंतु भ्रष्टाचार करून करून प्रचंड माजलेल्या आणि गेंड्याच्या कातडीचे बनलेल्या बोथे यांनी चक्क पोस्टाद्वारे आलेली नोटीस देखील स्वीकारण्याचे सौजन्य दाखवले नाही. शिवाय त्यांच्या वैयक्तिक फोन नंबरवर संपर्क केला असता, मी आजारी असल्याचे त्यांनी कळवले. यावरून हे स्पष्ट आहे की, प्रकाश बोथे हे मचोर...आणि वरून शिरजोरफ या उक्तीप्रमाणे वागणारे मुजोर व्यक्तिमत्व आहे. प्रकाश नामदेव बोथे यांच्या या नालायक कृतीमुळे अखेर चौकशी समितीने त्यांच्यावर कारवाई करण्याची शिफारस आपल्या अहवालात केली. खरे तर सुमारे आठ महिन्यांपूर्वी हा अहवाल आरोग्य उपसंचालक अकोला यांना पाठवण्यात आलेला आहे. परंतु आरोग्य उपसंचालक अकोला डॉ. कमलेश भंडारी यांनी हा अहवाल




धूळखात ठेवला आहे. अत्यंत बेजबादारपणे आणि बेदरकारपणे भ्रष्टाचार करणारा, शासनाला कोट्यवधी रुपयांचा चुना लावणाऱ्या आणि शिक्षण पात्रता लायकी नसतानाही पदावर असणाऱ्या जिल्हा सामान्य रुग्णालयात काही अधिकारी व कर्मचारी विरोधात तात्काळ कारवाई होणे गरजेचे आहे. परंतु डॉ. भंडारी यांना बुलडाणा जिल्हा सामान्य रुग्णालयातील सर्व भानगडी राजकीय व शासकीय नेत्यांना व वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती असून हे नेमके कशासाठी टाळाटाळ करीत आहेत, हे अद्यापही कोणाच्या लक्षात आलेले नाही. उपसंचालक अकोला डॉ. भंडारी यांनी कारवाई न करण्याचे कारण नेमके काय, हे खरे तर जनतेला कळणे गरजेचे आहे. यासंदर्भात सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या वतीने डॉ. भंडारी यांच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न करण्यात येत असून, परंतु डॉ. भंडारी उप संचालक अकोला हे माहिती देण्यापासून आणि पत्रकारांच्या प्रश्नांपासून अक्षरशः पळ काढताना दिसून येत आहेत. प्रकाश बोथे यांच्यावर फौजदारी कारवाई केली, तर आरोग्य विभागावर नेमके असे कोणते आकाश येऊन कोसळणार आहे, हा न कळण्यापलिकडे गेलेला विषय आहे. कदाचित बोथे हे आपल्याच अधिकाऱ्यांना ब्लॅकमेल तर करीत नाहीत ना, असाही प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे. बोथे हे जर अधिकाऱ्यांना ब्लॅकमेल करीत असतील, तर यामध्ये कोणाकोणाचे पितळ उघडे पडणार आहे, हाही मोठा प्रश्न आहे. त्यामुळे डॉ. भंडारी यांना आमचे आवाहन आहे की, तुम्ही तात्काळ अशा भ्रष्टाचारी व नालायक अधिकाऱ्यावर कारवाई करावी. अन्यथा तुमचा ढिसाळपणा आणि तुमचा निष्क्रियपणा सिद्ध होईल. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज भ्रष्टाचार करणारे आणि भ्रष्टाचाऱ्यांना वाचवणाऱ्या कोण्याही अधिकाऱ्याची गय करीत नाही. जोपर्यंत प्रकाश नामदेव बोथे हल्ली मुक्काम गोरक्षण रोड परीसर अकोला सारख्या नालायक, निर्लज्ज, भ्रष्टाचारी आणि बदमाश अधिकाऱ्याला गजाआड केले जात नाही, तोपर्यंत या विषयाचा पाठपुरावा करीतच राहणार आहे. **प्रकाश नामदेव बोथे यांच्या सारखे किती शैक्षणिक पात्रता नसून व दिव्यांग अस्तित्वंग बोगस प्रमाणपत्रावर कार्यरत आहे. ती पोलखोल पुढील सत्रात**

# केळवद येथे केली घरफोडी..मग लागली हातकडी!

**जनसंचलन/बुलढाणा**

केळवद येथील एका घरफोडीतील आरोपीला चिखली पोलीस ठाण्यातील डि बी पथकाने अवघ्या २४ तासात बेड्या ठोकून चोरलेला तब्बल २ लाख ७२ हजारांच्या सोन्याच्या दागिन्यांचा मुद्देमाल जप्त केला आहे.विजय महादू गवई असे आरोपीचे नाव आहे. चिखली तालुक्यातील केळवद येथील राजेंद्र बाबुराव पाटील हे ७ मार्च रोजी कुटुंबासह बाहेरगावी लाखनवाडा येथे गेले होते.दरम्यान रात्री दहा वाजताच्या सुमारास ते परत आली असता, त्यांना घराच्या दाराचे कुलूप तुटलेले दिसले. घरात प्रवेश करून पाहिले असता कपाटातील तिजोरी उघडी दिसली.या तिजोरीतील सोन्याची चैन, अंगठी असा एकूण २,७२,५०० किंमतीचे सोन्याचे दागिने चोरी झाल्याचे समजले. दरम्यान राजेंद्र पाटील यांनी चिखली पोलीस स्टेशनला तक्रार केली होती. ठाणेदार संग्राम पाटील यांनी डि बी पथकाला हा तपास सोपविला होता. पथकातील सफौ राजेंद्र काळे, निलेश सावळे, अजय इटावा यांनी तपास सुरू केला असता त्यांना आरोपीबाबत गोपनीय माहिती मिळाली असता त्यांनी आरोपी विजय महादू गवई याला ताब्यात घेतले. पोलिसी खाक्या दाखवताच त्याने




घरफोडीची कबुली दिली असून,आरोपी कडून चोरीतील मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# ...नापासांची दोन महिन्यात पुनर्परीक्षा!...

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद पाचवी आणि आठवीच्या वर्गासाठी वार्षिक परीक्षा, पुनर्परीक्षा व मूल्यमापन यांची कार्यपद्धती निश्चित करत आहे. पाचवी आणि आठवी हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील महत्त्वाचे टप्पे आहेत. त्यामुळे त्या टप्प्यापर्यंत त्यांना शिकवलेल्या गोष्टी व्यवस्थित समजल्या आहेत की नाही, याची पडताळणी होण्याच्या दृष्टीने परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तशी पूर्वीचीच सर्व वर्गात परीक्षा ही पद्धत योग्य होती. गुणवंत विद्यार्थी बरोबर गाळून पुढील उच्च शिक्षणासाठी पाठवली जात होती. पुन्हा जुने तेच सोने हे सत्य शासनाच्या प्रत्ययास येत आहे. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर लेख शासनाची उपरती दर्शवित आहे.... संपादक.

राज्यात नवे शैक्षणिक धोरण लागू करायचे असेल, तर गुणवत्तेच्या दृष्टीने पहिलीपासून आठवीपर्यंत नापास करायचे नाही, हे परवडणारे नाही, हे लक्षात आल्यावर शालेय शिक्षण विभाग यावर्षीपासून पाचवी आणि आठवीच्या वर्गांच्या वार्षिक परीक्षा घेणार आहे. पाचवी आणि आठवी या टप्प्यांवर प्रत्येक विद्यार्थ्याच्या गुणवत्तेची परीक्षा होणार आहे. राज्य शिक्षण मंडळाच्या अनुदानित आणि विनाअनुदानित सर्व शाळांना हा नियम लागू असेल. शिक्षण विभाग बिनकामाचे नियम निर्गमित करून विद्यार्थी, पालक व शिक्षक यांचे माथे भडकून घेते, त्यातून काही एक साध्य होत नाही. हा नेहमीचाच उपद्रव झाला आहे; ज्याला विभाग नवीन प्रयोग असे गोजिरवाणे संबोधन लावत असतो. बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायद्यानुसार विद्यार्थ्यांना आठवीपर्यंत अनुत्तीर्ण करता येत नव्हते. मात्र, विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण मूल्यमापन करण्याची सक्ती या कायद्यात होती. त्याकडे दुर्लक्ष झाल्याने विद्यार्थी बहुतांश विषयात कच्चा राहू लागले. त्यांची गुणवत्ता थेट नववीच्या वार्षिक परीक्षेत मोजली जाऊ लागल्याने विद्यार्थी परीक्षेत अपयशी ठरत होते. आता नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू करावे लागणार आहे. यात गुणवत्तेला अधिक प्राधान्य आहे. म्हणून शालेय शिक्षणात दोन टप्प्यांवर विद्यार्थ्यांची गुणवत्ता जोखण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे. त्यासाठी महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११मध्ये राज्य सरकारने सुधारणा केली आहे, असे दिसते. ते सूर्यप्रकाशात स्पष्टपणे पुढे दिसणारच आहे. सुधारित नियमांनुसार इयत्ता पाचवीच्या वर्गापर्यंत बालकाला वयानुरूप वर्गामध्ये प्रवेश देण्यात येईल. इयत्ता सहावी ते आठवीच्या वर्गात वयानुरूप प्रवेश देताना बालकास पाचवीच्या वर्गासाठीची विहित केलेली वार्षिक परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील. बालक ही परीक्षा उत्तीर्ण नसल्यास त्या बालकाला पाचवीच्या वर्गात प्रवेश देण्यात येईल. यामुळे आता शाळेतील प्रवेशाच्या एक टप्प्यावर म्हणजे पाचवीला परीक्षा देत त्याची गुणवत्ता सिद्ध करावी लागणार आहे. त्यामुळे शिक्षक आणि पालक या दोघांचीही शैक्षणिक जबाबदारी वाढणार आहे. नेहमीप्रमाणे डोकेदुखी पाठ सोडणारच कशी? यासंबंधी अधिसूचना जारी करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांनी पुढील वर्गात जाण्यासाठी गुणवत्ता सिद्ध करता यावी म्हणून प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या शेवटी पाचवी आणि आठवीच्या वर्गासाठी वार्षिक परीक्षा घेतली जाणार आहे. विद्यार्थी वार्षिक परीक्षा उत्तीर्ण होऊ शकला नाही, तर अशा बालकाला संबंधित विषयासाठी शाळेला अतिरिक्त पूरक मार्गदर्शन द्यावे लागेल आणि वार्षिक परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यापासून दोन महिन्यांच्या आत त्याची पुनर्परीक्षा घ्यावी लागेल. विद्यार्थी पुनर्परीक्षेत नापास झाले, तर त्यांना पाचवी किंवा आठवीच्या वर्गात, जसे असेल तसे ठेवले जाईल. मात्र, प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही बालकाला शाळेतून काढून टाकले जाणार नाही, असाही दिलासा दिला जात आहे. पहिलीपासून परीक्षाच नाही, असा समज झाला होता. परंतु प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्याचे सर्वंकष मूल्यमापन झाले पाहिजे. त्यामुळे पाचवी आणि आठवीला वार्षिक परीक्षा सुरू होणार असेल, तर त्याचे स्वागत आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाविषयी गांभीर्य रुजेल आणि शैक्षणिक गुणवत्तेत वाढ होण्यासही मदत होईल, असा शेवटी सकारात्मक विचार करणेच महत्वाचा ठरतो, हेच खरे!

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद पाचवी आणि आठवीच्या वर्गासाठी वार्षिक परीक्षा, पुनर्परीक्षा व मूल्यमापन यांची कार्यपद्धती निश्चित करत आहे. पाचवी आणि आठवी हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील महत्त्वाचे टप्पे आहेत. त्यामुळे त्या टप्प्यापर्यंत त्यांना शिकवलेल्या गोष्टी व्यवस्थित समजल्या आहेत की नाही, याची पडताळणी होण्याच्या दृष्टीने परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पाचवी ते आठवीच्या परीक्षांत नापासही केले जाणार, अशी नुसतीच भिती दाखविली जात आहे, मात्र प्रत्यक्षात तो पहिल्याच प्रयत्नात पास होईल, यासाठी शाळा प्रयत्नशील असेल, हे निश्चित! पाचवीला ५० गुणांची, तर आठवीला ६० गुणांची वार्षिक परीक्षा घेतली जाईल, असे म्हटले जाते. राज्याच्या रिकामटेकड्या शालेय शिक्षण विभागाने आठवीपर्यंत सर्वच विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश देण्याच्या धोरणात बदल केला आहे. यंदापासून पाचवीच्या विद्यार्थ्यांची ५० गुणांची, तर आठवीच्या विद्यार्थ्यांची ६० गुणांची वार्षिक परीक्षा घेतली जाणार आहे. या परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना आता पुन्हा त्याच वर्गात बसावे लागणार आहे. राज्य सरकारने या परीक्षांची आणि त्यांच्या मूल्यमापनाची कार्यपद्धती जाहीर केली आहे. राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने आठवीपर्यंत सर्वच विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश देण्याच्या धोरणात बदल केला आहे. यंदापासून पाचवीच्या विद्यार्थ्यांची ५० गुणांची, तर आठवीच्या विद्यार्थ्यांची ६० गुणांची वार्षिक परीक्षा घेतली जाणार आहे. या परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना आता पुन्हा त्याच वर्गात बसावे लागणार आहे. राज्य सरकारने या परीक्षांची आणि त्यांच्या मूल्यमापनाची कार्यपद्धती जाहीर केली आहे.

आगाऊ प्रयोगशील महाराष्ट्र राज्यात २०१०-११पासून पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी सर्वंकष मूल्यमापन कार्यपद्धती लागू करण्यात आली. त्यानुसार मूल्यमापनामध्ये ड्ढफ श्रेणी मिळालेल्या अथवा अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण न करता त्यांनाही पुढील वर्गात प्रवेश दिला जात होता. मात्र त्यातून विद्यार्थ्यांचे अभ्यासाकडे दुर्लक्ष होत होते. तसेच विद्यार्थ्यांना वयानुरूप प्रवेश द्यायचा असल्याने त्यांना मागील वर्गातील अध्ययन कौशल्य अपेक्षित प्रमाणात मिळाली नसली तरी त्यांना पुढील वर्गात प्रवेश द्यावा लागत होता. त्यातून मुलांच्या पुढील अध्ययनात अडथळा येत असे. या पार्श्वभूमीवर आता इयत्ता पाचवी आणि आठवीसाठी परीक्षा घेण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. पाचवीच्या विद्यार्थ्यांची १० गुणांची तोंडी आणि ४० गुणांची लेखी परीक्षा घेतली जाणार आहे. तर आठवीच्या विद्यार्थ्यांची १० गुणांची तोंडी आणि ५० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येणार आहे. या परीक्षा दुसऱ्या सत्राच्या अभ्यासक्रमावर आधारित असतील. परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांना ३५ टक्के गुण मिळवावे लागतील. मात्र विद्यार्थी नापास झाल्यास त्यांना शाळेतील शिक्षकांकडून अतिरिक्त पूरक मार्गदर्शन केले जाणार आहे. त्यानंतर या विद्यार्थ्यांची जून महिन्यामध्ये पुन्हा परीक्षा घेतली जाणार आहे. या पुनर्परीक्षेतही अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना पुन्हा त्याच वर्गात बसावे लागणार आहे. नव्या बदलामुळे विद्यार्थ्यांनी इयत्ता पाचवी आणि आठवीसाठी किमान अपेक्षित अध्ययन कौशल्य प्राप्त केले की नाही, याची खात्री करता येईल. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना नियमित अभ्यासाची सवय लावण्यासह पुढील शैक्षणिक आव्हाने आणि स्पर्धा परीक्षांना सामोरे जाण्यासाठी तयार करण्याचा उद्देश असल्याचे सरकारकडून नव्या निर्णयाचे समर्थन करताना सांगण्यात आले आहे, बघुया, किती प्रभाव दिसतो ते!

राज्य सरकारने या परीक्षांचे सनियंत्रण आणि पर्यवेक्षण करण्यासाठी राज्य, जिल्हा, तालुका, केंद्र स्तरावर सनियंत्रण समित्या स्थापन करण्याचाही निर्णय घेतला आहे. या परीक्षा शाळास्तरावर घेतल्या जाणार आहेत. मात्र परीक्षांवेळी केंद्रस्तरीय भरारी पथके तयार करून शाळांना भेटी दिल्या जाणार आहेत. त्यानुसार या परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पडत असल्याची काळजी घेतली जाणार आहे. पाचवीपर्यंत विद्यार्थ्यांना त्यांच्या वयानुसार थेट प्रवेश दिला जाणार आहे. मात्र सहावी ते आठवी इयत्तेच्या वर्गात विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यापूर्वी त्यांना पाचवीची परीक्षा उत्तीर्ण करावी लागणार आहे. या परीक्षेत अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची पुनर्परीक्षा घेतली जाणार आहे. यावर प्रतिक्रिया व्यक्त करतांना म्हणावेसे वाटते, की एक ना धड; भाराभर चिंध्या! !! सर्व विद्यार्थी मित्रांना गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार शिक्षणासाठी हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

## नोकरीच्या रिक्त जागेवर बेकायदेशीर नियुक्ती सौ.सिंधुताई भीमराव डोंगरदिवेंनी पुकारले बेमुदत उपोषण!

**जनसंचलन/बुलढाणा**

नगर पालिकेतील नोकरीच्या रिक्त झालेल्या जागेवर बेकायदेशीरपणे दुसऱ्याची नियुक्ती करण्यात आल्याचा आरोप करत, सदर नियुक्ती रद्द करण्याच्या मागणीसाठी सौ. सिंधुताई भीमराव डोंगरदिवे या महिलेने जिल्हाधिकारी समोर आमरण उपोषण पुकारले आहे. सौ. सिंधुताई भीमराव डोंगरदिवे यांचे मयत आजोबा ईश्राम कचरू गवई हे नगर परिषदेत नोकरीवर होते. त्यांच्या मृत्यूनंतर रिक्त झालेल्या जागेवर अर्चना विक्रांत बेंडवाल यांची बेकायदेशीरपणे नियुक्ती करण्यात आल्याचा आरोप सौ. डोंगरदिवे यांनी केला आहे. सदर नियुक्ती रद्द करावी व या प्रकरणी तात्काळ चौकशी लावून न्याय मिळवून द्यावा,या मागणीसाठी सौ. सिंधुताई भीमराव डोंगरदिवे यांनी आमरण



उपोषण सुरू केले आहे. जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत उपोषण सुरूच राहील, अशी तटस्थ भूमिका त्यांनी घेतली आहे.

पत्रकारीतेचा धर्म आम्ही निभावणार

सिटी न्यूज टीव्ही बुलडाणा

सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल

वेब साईड & पोर्टल चॅनल

वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर

कुठली ही बातमी निशुल्क

***

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

काही तक्रार असल्यास संपर्क

शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040

पिन 443001

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.

(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# राज्यात आर्थिक बेशिस्तीचा कारभार, अर्थसंकल्पावर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ संतापले...

**बुलढाणा :** आजचा अर्थसंकल्प म्हणजे आकड्यांचा आणि मागील पानावरून पुढे असा आहे. कोणत्याही घटकाला यातून काहीही फायदा होणार नाही. राज्यावर आठ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त असून उत्पन्नापेक्षा खर्च जास्त आहे. निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता न करता सरकारने राज्यातील जनतेचा विश्वासघात केला आहे. राज्यात आर्थिक बेशिस्तीचा कारभार सुरू असून महाराष्ट्र आता थांबणार नाही, तर भाजपा युती सरकार राज्याला कर्जबाजारी करून देशोधडीला लावणार असेच दिसते, अशी खोचक प्रतिक्रिया काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केली.

राज्याचा अर्थसंकल्प हा महानगरांसाठी बनवलेला आहे. त्यात मेट्रो, उड्डाणपूल, भुयारी मार्ग, विमानतळे, कनेक्टिव्हिटी पायाभूत सुविधा यांचाच बोलबाला आहे. पण राज्यातल्या जनतेला भेडसावणाऱ्या मूलभूत समस्या सोडविण्याबाबत सरकारकडे काही ठोस धोरण किंवा उपाययोजना नाही. अर्थसंकल्पात प्रत्येक विभागाला निधीची केलेली तरतूद ही मंत्रांना मलई खाण्यासाठी दाखविलेला लोण्याचा गोळा आहे, असा टोलाही सपकाळांनी लगावला.आजच्या अर्थसंकल्पात शेतकरी कर्जमाफीबद्दल एक शब्द काढला नाही. शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याची घोषणासुद्धा पोकळ आहे. आजही शेतकऱ्यांना वसुलीसाठी वीज बिले पाठवली जात आहेत.

शेतकरी सन्मान निधीत वाढ करण्याचे आश्वासन दिले, पण अंमलबजावणी नाही. शेतकऱ्यांची मेहनत आणि कृषीक्षेत्रामुळे विकास दर वाढला, पण सरकारने शेतमालाला भाव न दिल्याने शेतकऱ्यांमध्ये रोष आहे, असं हर्षवर्धन सपकाळ म्हणाले. शेतकऱ्यांचा विरोध असतानाही शक्तीपीठ महामार्गाचा अट्टाहास करून भाजप युती सरकार शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करू पाहात आहे. समृद्धी महामार्गाने कोणाची समृद्धी हे सर्वांना माहित आहे. पण तशीच समृद्धी पुन्हा व्हावी यासाठी हा प्रयत्न सुरू आहे. सरकारने जाहीर केलेले प्रकल्प, गुंतवणूक ही फक्त मुंबई, नवी मुंबई, पुणे, नाशिक या भागापुरताच असून राज्याचा मोठा भाग विकासापासून वंचितच आहे, असा दावा हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. लाडकी बहीण योजनेतून २१०० रुपये देण्याची घोषणा केली नाही. हा शेतकरी व लाडक्या बहिणींचा विश्वासघात आहे. जवळपास १० लाख भगिनींना योजनेतून वगळल्याबद्दलही सरकारच्या धोरणावर सपकाळांनी ताशेरे ओढले. उद्योग धंद्याची वाढ ५.६ टक्क्यांवरून




४.९ टक्क्यांवर घसरली आहे. सेवा क्षेत्र ही घसरले आहे. त्यामुळे रोजगार कमी झाले आहेत. परकीय गुंतवणूक वित्तीय क्षेत्रात आली आहे, औद्योगिक क्षेत्रात नाही ही अत्यंत काळजी वाढवणारी बाब असल्याचे प्रदेशाध्यक्षांनी यावेळी सांगितले. आर्थिक सर्वेक्षण अहवालानुसार फक्त मुंबई पुणे, ठाणे, नाशिक, नागपूर, कोल्हापूर या जिल्ह्यांची परिस्थिती चांगली आहे. पण बाकी जिल्ह्यांची अवस्था दयनीय आहे. या जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न देशाच्या सरासरी उत्पन्नापेक्षा कमी आहे. ५० लाख रोजगार निर्मिती करण्याचे उद्दिष्ट ऐकायला चांगले, पण हे आकडे फक्त कागदावरच राहणार आहेत. महाराष्ट्रात बेरोजगारांच्या फौजा आहेत. त्यांच्या हाताला नोकरी रोजगार नाही. राज्यातील बेकारीचे चित्र भयावह आहे. राज्य सरकारची अडीच लाख रिक्त पदे आहेत, ती भरण्यासाठी काहीच धोरण नाही, असे सपकाळ म्हणाले.

# कॅलरी व शुगरने खच्चून भरलेली ही ६ फळं खाणं लगेच करा बंद....

## पोटावरचे चरबीचे टायर्स फुटतील, सरसर वेगाने कमी होईल वजन

सध्याच्या धावपळीच्या जीवनशैलीत अनियमित आहार आणि तासनतास बसून काम करण्यामुळे लठ्ठपणा ही सर्वसामान्य समस्या बनली आहे. वजन वाढल्याने आत्मविश्वासावर परिणाम होतोच, पण त्यासोबत डायबेटीस, हृदयरोग आणि उच्च रक्तदाबासारख्या गंभीर आजारांचेही दार उघडले जाते. त्यामुळे अनेकजण वजन कमी करण्यासाठी डाएट आणि व्यायामाचा मार्ग स्वीकारतात, पण त्यात काही चुका केल्याने अपेक्षित परिणाम मिळत नाहीत. त्यापैकी एक मोठी चूक म्हणजे योग्य फळांची निवड न करणे. सर्व फळे आरोग्यासाठी फायदेशीर असली तरी काही फळांमध्ये नैसर्गिक साखर आणि कॅलरीचे प्रमाण जास्त असते, त्यामुळे ते वजन कमी करण्याऐवजी वाढवू शकतात. जाणून घ्या अशी कोणती फळे आहेत जी वजन कमी करताना टाळायला हवीत आणि त्याऐवजी कोणती फळे खाल्ल्यास फायदेशीर ठरेल. आंबा गोडसर आणि स्वादिष्ट असतो, मात्र, त्यामध्ये नैसर्गिक साखरेचे प्रमाण खूप जास्त असते, त्यामुळे त्याचे प्रमाणाबाहेर सेवन केल्यास रक्तातील साखरेचे प्रमाण वाढू शकते आणि वजन कमी करण्याच्या प्रक्रियेला अडथळा निर्माण होऊ शकतो. आंब्यामध्ये विटॅमिन आणि अँटीऑक्सिडंट्स असले तरी, वजन कमी करताना त्याचे प्रमाण मर्यादित ठेवणे आवश्यक आहे. आंबा खायचा असेल तर तो कमी प्रमाणात खा. त्याला स्ट्रॉबेरी, ब्लूबेरी किंवा सफरचंदासोबत मिसळून खाल्ल्यास त्याचा प्रभाव कमी होतो. द्राक्षे दिसायला लहान असली तरी त्यामध्ये ग्लायसेमिक इंडेक्स जास्त असल्याने ती रक्तात पटकन साखर मिसळतात, ज्यामुळे शरीरातील फॅटचे प्रमाण वाढू शकते. सतत द्राक्षे खाल्ल्यास वजन कमी करण्याच्या प्रक्रियेला मर्यादा येऊ शकते. त्याऐवजी फायबरयुक्त फळे जसे सफरचंद किंवा नाशपती खाल्ल्यास जास्त फायदा होतो. द्राक्षांचे प्रमाण अत्यल्प ठेवावे आणि संपूर्ण दिवसात मर्यादित प्रमाणातच सेवन करावे. चेरी हे अँटीऑक्सिडंट्स आणि विटॅमिन ने समृद्ध असलेले फळ आहे, पण त्यातही साखरेचे प्रमाण खूप जास्त असते. खूप प्रमाणात चेरी खाल्ल्यास शरीरातील रक्तातील साखरेचे प्रमाण वाढते, त्यामुळे वजन कमी करताना त्याचे सेवन मर्यादित ठेवणे गरजेचे आहे. चेरी खाण्याऐवजी स्ट्रॉबेरी, ब्लूबेरी किंवा रास्पबेरी यासारखी कमी कॅलरी आणि जास्त फायबर असलेली फळे निवडावीत. केळे ऊर्जा देणारे फळ आहे, मात्र त्यातील




कार्बोहायड्रेट्सचे प्रमाण जास्त असल्याने वजन कमी करताना ते मर्यादित प्रमाणात खाणे गरजेचे आहे. जरी त्यात फायबर आणि पोटॅशियम असले तरी कमी कॅलरी असलेल्या फळांच्या तुलनेत त्याचा जास्त वापर वजन कमी करण्याच्या प्रक्रियेला बाधा आणू शकतो. जर केळे खायचेच असेल तर छोटे केळे खा आणि ते इतर कमी कॅलरीच्या फळांसोबत खा. पपई, संत्रे किंवा सफरचंद यांना पर्याय म्हणून निवडू शकता. लिची हे उन्हाळ्यात मिळणारे गोडसर आणि रसदार फळ आहे, पण त्यात फ्रक्टोजचे प्रमाण जास्त असते, जे फॅटच्या संचयाला कारणीभूत ठरू शकते. त्यामुळे वजन कमी करण्याच्या प्रयत्नात असाल तर लिची खाण्याचे प्रमाण नियंत्रित असायला हवे. लिची खाण्याऐवजी सफरचंद, नाशपती किंवा पेरू खाल्ल्यास फायबर अधिक मिळते आणि रक्तातील साखर नियंत्रित राहते.कलिंगड हे उन्हाळ्यातील हायड्रेटिंग आणि हलके फळ आहे, पण त्याचा ग्लायसेमिक इंडेक्स जास्त असल्याने ते रक्तातील साखर वेगाने वाढवते. कलिंगड खाल्ल्यावर लवकर भूक लागते आणि त्यामुळे अतिरिक्त खाण्याची सवय लागू शकते. कलिंगड खाण्याचे प्रमाण मर्यादित ठेवावे आणि ते इतर फायबरयुक्त फळांसोबत खाल्ल्यास जास्त फायदेशीर ठरेल.फळे आपल्या आरोग्यासाठी खूप लाभदायक असतात पण वजन कमी करताना काही फळांचे जास्त सेवन करणे चांगले नसते. आंबा, द्राक्षे, चेरी, केळी, लिची आणि कलिंगड यांसारख्या फळांमध्ये कॅलरीज आणि साखर जास्त असते, त्यामुळे त्यांचे जास्त सेवन केल्याने वजन वाढण्यास मदत होते. वजन कमी करण्यासाठी तुमच्या आहारात फायबर आणि लो-कॅलरी फळांचा समावेश करा जसे की सफरचंद, नाशपाती, ब्लूबेरी आणि स्ट्रॉबेरी.

# मेट्रो, महामार्ग, सागरी वाहतूक, गुंतवणूक; फडणवीस सरकारच्या अर्थसंकल्पातून १० मोठ्या घोषणा...

**मुंबई:** महायुती २.० सरकारचा पहिला अर्थसंकल्प अर्थमंत्री अजित पवारांनी आज सादर केला. त्यांचं अर्थसंकल्पीय भाषण जवळपास ७० मिनिटं चाललं. त्यातून त्यांनी अनेक महत्त्वाच्या घोषणा केल्या. सत्तेत पुन्हा आल्यास लाडक्या बहिणींना १५०० रुपयांऐवजी २१०० रुपये देण्याचं आश्वासन महायुतीकडून देण्यात आलं होतं. पण याबद्दलची घोषणा सरकारकडून करण्यात आलेली नाही.

१. मुंबई महानगर प्रदेश म्हणजेच एमएमआरडीएला आंतरराष्ट्रीय दर्जाचं आर्थिक विकास केंद्र अर्थात ग्रोथ हब म्हणून विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वांद्रे-कुर्ला संकुल, कुर्ला-वरळी, वडाळा, गोरेगाव, नवी मुंबई, खारघर, विरार-बोईसर या ७ ठिकाणी आंतरराष्ट्रीय दर्जाची व्यापार केंद्र निर्माण केली जाणार आहेत. एमएमआरडीएची सध्याची अर्थव्यवस्था १४० बिलियन डॉलरची आहे. ती २०३० पर्यंत ३०० बिलियन डॉलर आणि २०४७ पर्यंत १.५ ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याचा सरकारचा मानस आहे.

२. पायाभूत विकास आणि पायाभूत सुविधांमध्ये १ रुपया गुंतवल्यास स्थूल राज्य उत्पन्नात २.५ ते ३.५ रुपयांची वाढ होते. ही बाब लक्षात घेऊन विमान चालन, रेल्वे. मेट्रो, महामार्ग, जल वाहतूक, बंदर विकास, सिंचन, ऊर्जा, परिवहन आणि दळणवळण क्षेत्रांमध्ये पुढील ५ वर्षांत विक्रमी गुंतवणूक करण्याचं सरकारचं उद्दिष्ट आहे.

३. महाराष्ट्र सागरी विकास धोरण २०२३ मध्ये बंदर विकासासाठी स्वामीत्वधन, अकृषिक कर, वीज शुल्क, मुद्रांक शुल्क यातून सूट देण्यात आली आहे. वीजेसाठी औद्योगिक दर लागू करण्यात आला आहे. प्रवासी जल वाहतूक आणि किनारी पर्यटनाला चालना देण्यासाठी प्रवासी आणि बंदर करातून सूट देण्यात आली आहे. बंदरांच्या करारांचा कमाल कालावधी ९० वर्षे करण्यात आलेला आहे. गेटवे ऑफ इंडिया, मुंबई ते मांडवा, एलिफंटापर्यंत सुरक्षित प्रवासासाठी अत्याधुनिक सुविधायुक्त बोटींसाठी आर्थिक प्रोत्साहन देण्याचं धोरण जाहीर करण्यात आलं आहे.४. नागपूर मेट्रोचा ४० किलोमीटर लांबीचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून दुसऱ्या टप्प्यातील ४३.८० किलोमीटर लांबीचं काम प्रगतीपथावर आहे. त्यासाठी ६ हजार ७०८ कोटी रुपयांचा खर्च येणार आहेत. तसंच पुण्यातील स्वारगेट ते कात्रज विस्तार मार्गिका प्रकल्पाला केंद्र शासनानं मान्यता दिली आहे. पुणे मेट्रो रेल्वे टप्पा २ अंतर्गत खडकवासला-स्वारगेट-हडपसर-खराडी आणि नळ स्टॉप-वारजे-माणिकबाग या २ मार्गिकांचा ९,८९७ कोटी रुपये किमतीचा प्रस्ताव केंद्र सरकारच्या मान्यतेसाठी पाठवण्यात आलेला आहे. हवामान बदल आणि समुद्र पातळीत होत असलेल्या वाढीमुळे होणाऱ्या नैसर्गिक आपत्तींपासून बचाव करण्यासाठी किनारी जिल्ह्यांमध्ये ८,४०० कोटी रुपये किमतीचा बाह्यसहाय्यित प्रकल्प राबवण्यात येणार





आहे.महाराष्ट्र शाश्वत पर्यावरणपूरक किनारा संरक्षण आणि व्यवस्थापन या ४५० कोटी रुपये किमतीच्या प्रकल्पाच्या अंतर्गत सिंधुदुर्गातील देवबागमध्ये १५८ कोटी रुपये किमतीच्या कामांना मान्यता देण्यात आलेली आहे. यामुळे सागरी किनाऱ्यावर राहणाऱ्या नागरिकांच्या जीविताचे आणि मालमत्तांचं संरक्षण होईल.रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाकडून मायक्रोसॉफ्ट कंपनीमार्फत १० हजार महिलांना कौशल्य आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विषयाचं प्रशिक्षण देण्यात येत आहे. राज्याला तांत्रिक वस्त्रोद्योगाचं जागतिक केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी महाराष्ट्र टेक्निकल टेक्स्टस्टाईल मिशनची स्थापना करण्यात येणार आहे. विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी याचा उपयोग होईल. हातकाम विणकरांना प्रोत्साहन आणि सुविधा देण्यासाठी नागपुरात अर्बन हाट इंडियाची स्थापना करण्यात येणार आहे. बंगळुरु-मुंबई इंडस्ट्रीयल कॉरिडॉरसाठी भूसंपादनाचं काम सुरु असून यामुळे अवर्षणप्रवण भागात उद्योगांची स्थापना होऊन रोजगार निर्मितीला चालना मिळेल.समृद्धी महामार्गाचं ९९ टक्के काम पूर्ण झालं आहे. त्यावर ६४,७५५ कोटी रुपये खर्च झाले आहेत. तर इगतपुरी ते आमणे हा ७६ किमी लांबीचा टप्पा लवकरच वाहतुकीसाठी खुला करण्यात येईल. या महामार्गाजवळ ॲग्रो-लॉजिस्टिक हब विकसित केला जाणार असून त्यामध्ये कोल्ड स्टोरेज, ग्रेडिंग, पॅकिंग आणि निर्यात हाताळणी केंद्रांच्या सुविधा पुरवण्यात येतील. त्याचा फायदा विदर्भ, मराठवाड्यातील शेतकऱ्यांना होईल.

१०. मुंबई उपनगरातील वाहतूक गतीमान करण्यासाठी वर्सोवा ते मढ खाडीपूल, वर्सो वा ते भाईंदर किनारी मार्ग, मुलंड ते गोरेगाव, ठाणे ते बोरिवली, ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह भुयारी मार्ग असे ६४,७८३ कोटी रुपयांचे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील खोपोली ते खंडाळा या घाट लांबीतील मिसिंग लिंक प्रकल्पाचं काम ऑगस्ट २०२५ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे.

# ॲड. सदावर्तेंचा राज ठाकरेंना इशारा, म्हणाले असं करणं त्यांनी थांबवायला हवं, नाहीतर....

**मुंबई :** राज ठाकरे यांनी कुंभमेळ्याविषयी केलेल्या वक्तव्यानंतर त्यांच्यावर टीकेची झोळ उठली आहे. महाकुंभाविषयी चुकीचे भाष्य करत राज ठाकरेंनी हिंदुंच्या भावना दुखावल्याचा आरोप समाजातील लोकांकडून केला जात आहे. आणि अशातच ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनीही यात उडी घेतली आहे. राज ठाकरे यांचं वक्तव्य बाळा नांदगावकर यांचा तर अपमान होताच, मात्र त्यांनी तमाम स्त्रिया आणि हिंदू भाविकांचाही अपमान केला असल्याची संतप्त प्रतिक्रिया ॲड. सदावर्ते यांनी दिली आहे. मनसेच्या १९ व्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमात प्रयागराजमधील कुंभमेळ्याची राज ठाकरे खिल्ली उडवली. त्यावर प्रतिक्रिया देताना सदावर्ते यांनी राज ठाकरेंवर टिकास्त्र सोडले आहे. ङ्कदेशातली एकही नदी स्वच्छ नाही. कोरोना आजारातून देश नुकताच बाहेर निघाला आहे. मात्र कुणालाही त्याचं देणंघेणं नाही. आणि लोक कुंभमेळ्यात गर्दी करत अंघोळी करत आहेत. श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातला फरक समजा. अंधश्रद्धेतून जरा बाहेर या, डोकी हलवाङ्क. असं म्हणत राज ठाकरे यांनी कुंभमेळ्यातील पवित्र स्नानावर भाष्य करत खिल्ली उडवली.राज ठाकरे यांच्या या वक्तव्याचा समाजातील लोकांकडून निषेध करण्यात येत आहे. दरम्यान, राज ठाकरे यांनी महाकुंभाविषयी बोलताना बाळा नांदगावकर यांचा अपमान तर केलाच आहे, सोबत अशाप्रकारचं वक्तव्य करुन त्यांनी तमाम स्त्रिया आणि हिंदू भाविकांचाही अपमान केला आहे. या विधानाकरिता राज ठाकरे यांनी कुंभला जाऊन जाहीर माफी मागितली पाहिजे. असं ॲड. सदावर्ते म्हणाले. परप्रांतीय नागरिकांबद्दल बोलताना सदावर्ते म्हणाले की, राज ठाकरे नेहमी फेरीवाले आणि कष्टकरणाऱ्या लोकांना परप्रांतीय म्हणून निषाणा साधतात. असं करणं त्यांनी थांबवायला हवं. नाहीतर येणाऱ्या काळात त्यांना जशास तसे उत्तर दिले जाईल. असा





इशाराही त्यांनी दिला.दरम्यान, राज ठाकरेंनी महाकुंभाविषयी केलेल्या विधानाबद्दल भाजप नेते नितेश राणे यांनीही त्यांच्यावर टीका केली आहे. प्रयागराजला जाऊन मी आणि माझ्या आईने स्नान केलं, आम्हाला कसलाच त्रास जाणवला नाही. आमच्या आस्थेबाबत त्यांनी बोलू नये. असं ते म्हणाले. तर दुसरीकडे, आमदार जितेंद्र आव्हाड यांनी राज ठाकरेंच्या डेअरींगला सलाम आहे, त्यांनी जे वक्तव्य केलं त्याबद्दल त्यांना मानाचा मुजरा असं म्हणत राज ठाकरेंचं समर्थन केलं आहे.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# रोहित शर्माने विजयानंतर तिरंगा घेत केली ही खास गोष्ट, कोणालाही समजला नाही त्या गोष्टीचा अर्थ...

**दुबई :** भारताने चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली आणि सर्वांनीच जोरदार सेलिब्रेशन केले. रोहित शर्माने जय शहा यांच्या हातून चषक घेतला, तो उंचावला. पण त्यानंतर रोहितने तिरंगा हातात घेत एकट्याने एक खास गोष्ट केली. बऱ्याच जणांना रोहितच्या या गोष्टीचा अर्थ तेव्हा समजला नव्हता. पण आता ती गोष्ट समोर आली आहे. रवींद्र जडेजाने चौकार लगावला आणि त्यानंतर स्टेडियमध्ये भारताच्या विजयाचा जयघोष झाला. विराट कोहली, रोहित शर्मा आणि भारताच्या सर्व खेळाडूंनी एकच कल्ला केला. सर्व खेळाडू स्टेडियममध्ये दाखल झाले. त्यानंतर प्रत्येक भारताचा खेळाडू एकमेकांना शुभेच्छा देण्यात गर्क झाले होते. त्याचबरोबर टीव्हीवरही हे खेळाडू आपल्या भावना व्यक्त करत होते. त्यानंतर स्टेडियममध्ये पोडियम सज्ज झालं आणि चॅम्पियन्स ट्रॉफी तिथे आणण्यात आली.जय शहा आणि रॉजर बिन्नी यांनी भारताच्या सर्व खेळाडूंना मेडल्स दिली. त्यानंतर जय शहा यांनी रोहित शर्माला चषक दिला. रोहित शर्माने तो चषक स्विकारला आणि त्यानंतर तो आपल्या संघातील खेळाडूंमध्ये गेला. यावेळी रोहित शर्माने चषक उंचावला आणि भारतीय संघाने जोरदार सेलिब्रेशन केले. त्यानंतर प्रत्येक खेळाडूने आपल्या हातात चषक घेतला आणि त्यांनी फोटो काढले. त्यानंतर रोहित शर्माने हा चषक आपल्या हातात घेतला, तिरंगा त्याने आपल्या अंगाला लपेटला आणि तो मैदानातील खेळपट्टीवर जाऊन बसला. रोहित शर्माने खेळपट्टीवर चषक ठेवला आणि त्यानंतर त्याने एक खास पोझ दिली. लोकांनी रोहितचे कौतुक त्यावेळी केले, पण रोहितने असं का केलं, हे कोणालाच समजलं नाही. भराताचा तिरंगा यावेळी रोहित शर्माने दुबईत फडकवला आणि आम्ही क्रिकेटवर कसे राज्य करतो, हे रोहितने आपल्या कृतीमधून दाखवून दिले.रोहित शर्माने यावेळी एक कर्णधार म्हणून एक मोठी गोष्ट यावेळी केल्याचे पाहायला मिळाले. कारण ही गोष्ट कोणालाही सुचणारी नव्हती आणि त्यामुळे रोहित शर्माने जी गोष्ट केली, त्याचं कौतुक आता सर्व स्तरावर होत असल्याचे आता होत असल्याचे समोर आले आहे.



# खरंतर हे काम अदानीचं..., महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पावर : उद्धव ठाकरे


'खरंतर हे काम अदानीचं...' बजेटवरून ठाकरेंचा निशाणा

**मुंबई :** दरवर्षीप्रमाणे यावर्षीदेखील अर्थसंकल्प सादर करण्यात आलेला आहे. मला आचार्य अत्रेंची आठवण आली. आचार्य अत्रे असते तर म्हणाले असते की, गेल्या १० हजार वर्षात एवढा बोगस अर्थसंकल्प मी पाहिला नव्हता, असा खोचक टोला माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी लगावला. या अर्थसंकल्पात मी सभागृहात बसून अर्थसंकल्प कसा मांडला जातोय, त्यातील काही गोष्टी समजून घेण्याचा प्रयत्न केला. त्याचा सार काढायचा झालं तर, उद्या सूर्य उगवणार आहे, सर्वांना प्रकाश मिळणार आहे आणि तुम्हाला विट्यामीन डी सुद्धा त्यातून मिळेल, अशा स्वरुपाचा हा अर्थसंकल्प आहे, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली. महायुतीकडून निवडणुकीच्या काळात वारेमाप जाहिराती करण्यात आल्या होत्या. ज्या गोष्टी जाहिरातीत सांगितल्या आणि सरकार निवडून आणलं, मतं मिळवली. ठीक आहे, त्यातील ईव्हीएम घोटाळा हा भाग वेगळा आहे. पण प्रचंड बहुमतवालं हे सरकार आहे. सरकारने दिलेल्या थापामधून एकतरी सरकारने पूर्ण केल्या आहेत का? लाडक्या बहिणींना २१०० रुपये दिले का?, असा सवाल उद्धव ठाकरे यांनी केला.मुख्यमंत्रांनी उगाच माझं नाव घेतलं होतं की, स्थगिती द्यायला मी काही मुख्यमंत्री नाही. मी त्यांना सांगितलं होतं की, तुम्हाला उद्धव ठाकरे होता येणार नाही. उद्धव ठाकरे व्हायचं असेल तर अर्थसंकल्पात मी जसं माझ्या नागपूरच्या पहिल्या अधिवेशनात शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची घोषणा करा आणि अंमलबजावणी करा, असं मी काल आवाहन केलं होतं. पण तसं केलं नाही, असं उद्धव ठाकरे म्हणाले.अर्थसंकल्पात सर्वसामान्य जनतेसाठी तसं काही नाही. पण कंत्राटदारांसाठी भरपूर खूप काही आहे. मुंबईमध्ये ६४ हजार ७८३ कोटींची विकासकामे, हा कसला विकास होणार आहे? हा कंत्राटदाराचा विकास आहे. कारण आताच मुंबईत सगळे रस्ते खोदून ठेवले आहेत, असं उद्धव ठाकरे म्हणाले.त्यात आणखी एक महत्वाचा मुद्दा, योग्य आहे की नाही हा सर्वांना विचार केला पाहिजे. दोन विमानतळ जोडणारी मेट्रोचं काम सरकार करत आहे. खरंतर हे काम अदानीचं आहे. कारण विमानतळाची कामे आणि सगळी जागा अदानीला दिली असेल तर हे काम अदानीने केलं पाहिजे. हे सरकारचं काम नाही. नाहीतर उद्या तुम्ही म्हणाल अदानीला विमानतळाची जागा दिली आहे. त्याच्यावर आम्ही रनवे बांधून देऊ. धावपट्टीपण करुन देऊ. पण तसं नाहीय. हे अदानीचं काम आहे. त्यांनी केलं पाहिजे, असं मत उद्धव ठाकरे यांनी मांडलं.

# माँ के संस्कार ! मॅच जिंकताच विराटच्या एका कृतीनं जिंकली मनं...

दुबई: भारताने न्यूझीलंडला ४ गडी राखून पराभूत करून तिसऱ्यांदा आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ जिंकली आहे. ७६ धावांच्या खेळीसाठी रोहित शर्माला सामनावीर म्हणून गौरविण्यात आले. कुलदीप यादव आणि वरुण चक्रवर्ती यांनी शानदार गोलंदाजी केली. केएल राहुलने कठीण काळात संघाला विजय मिळवून दिला. या विजयासह, भारत तीन वेळा चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकणारा पहिला देश बनला आहे. यापूर्वी भारताने २००२ आणि २०१३ मध्ये ही ट्रॉफी जिंकली होती. सामन्यानंतरचा विराट कोहलीचा एक व्हिडिओ आता जोरदार व्हायरल होत आहे. या ऐतिहासिक विजयानंतर टीम इंडियाचा स्टार फलंदाज विराट कोहलीचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये कोहली मोहम्मद शमीच्या आईला भेटताना आणि तिच्या पायांना स्पर्श करताना दिसत आहे. या व्हिडिओमध्ये मोहम्मद शमी त्याच्या आईला विराट कोहलीला भेटायला घेऊन जाताना दिसत आहे. शमीच्या आईला पाहून कोहली खूप आनंदी झाला आणि थोडा भावनिकही झाला. त्याने शमीच्या आईचे पाय स्पर्श केले आणि तिचे आशीर्वाद घेतले आणि





मग दोघांनीही एकमेकांना मिठी मारली. २०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये विराट कोहलीची कामगिरी खूप चांगली होती. अंतिम सामन्यात तो जास्त धावा करू शकला नाही आणि फक्त १ धाव करून बाद झाला. पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात त्याने शतक झळकावले. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या उपांत्य सामन्यातही विराटने अर्धशतक झळकावले. ५ सामन्यांमध्ये विराटने ५४ च्या सरासरीने २१८ धावा केल्या. सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत तो पाचव्या स्थानावर होता.या विजयात अनेक खेळाडूंनी योगदान दिले. रोहित शर्माने ८३ चेंडूत ७६ धावा केल्या आणि त्याला सामनावीर घोषित करण्यात आले. कुलदीप यादव आणि वरुण चक्रवर्ती यांनी शानदार गोलंदाजी केली. केएल राहुलने कठीण काळात संघाला विजय मिळवून दिला. हा विजय भारतीय क्रिकेटसाठी आणखी एक मैलाचा दगड ठरला. या विजयामुळे संघाचे मनोबल वाढेल आणि आगामी स्पर्धांमध्येही चांगली कामगिरी करण्याच्या आशा निर्माण होतील. भारतीय संघाने आपल्या उत्कृष्ट कामगिरीने संपूर्ण देशाला अभिमानाने भरले आहे.

# आयुध निर्माणी स्फोट प्रकरणात ४ अधिकाऱ्यांवर गुन्हे; निष्काळजीपणाचा ठपका, नऊ कर्मचाऱ्यांनी गमावलेला जीव...

**नागपूर:** जवाहरनगर आयुध निर्माणीत २४ जानेवारीला झालेल्या स्फोटात नऊ जणांचा मृत्यू झाला. चार अधिकाऱ्यांसह इतरांनी निष्काळजीपणा केल्यानेच हा स्फोट झाल्याचा ठपका ठेवत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. आरएक्स विभागातील एलटीपीई सेक्शनच्या इमारत क्रमांक २३मध्ये असलेल्या एक्सस्ट्रमिक्स मशीन व त्यातील उपकरणामध्ये बिघाड होत होता. या मशीनच्या दुरुस्तीकडे संबंधित अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष करण्यात आले. नियमित साफसफाई व देखभालीकडेही दुर्लक्ष केले गेले. प्रशिक्षणार्थींना अतिसंवेदनशील ठिकाण असलेल्या या विभागामध्ये कामाकरिता पाठविल्याचा ठपका चौकशी अहवालात ठेवण्यात आला आहे. त्यामुळे या विभागात कर्तव्यावर असलेल्या नऊ कर्मचाऱ्यांच्या मृत्यूस आयुध निर्माणी जवाहरनगरचे ङ्गसेफ्टी सेक्शनफ्ने विभागीय अधिकारी देवेंद्र रामदास मिना (४९), मेंटेनन्स विभागाचे ज्युनिअर वर्क मॅनेजर आदिल रशील फारुकी (४६ ), सामान्य प्रशासन विभागाचे संजय सुरेश धपाडे (४४) , सेक्शन प्रभारी अधिकारी आनंदराव मधुकरराव फाये (५०) व आयुध निर्माणी जवाहरनगर व्यवस्थापनातील इतर अधिकारी हे कारणीभूत असल्याचे निष्पन्न झाले आहे.

या चार अधिकाऱ्यांसह इतरांवर जवाहरनगरचे पोलिस निरीक्षक भिमाजी पाटील (४२) यांच्या तक्रारीवरून गुन्हा नोंद करण्यात आला. अधिक तपास उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत कुलकर्णी करीत आहेत. आयुध निर्माणीतील स्फोटात कर्तव्यावर असलेल्या तेरापैकी मनोज मेश्राम (५५,






रा. बेला), अजयकुमार नागदेवे (५१, रा. परसोडी), चंद्रशेखर गोस्वामी (४९ रा. जवाहरनगर), अभिषेक गोपाल चौरसिया (३८, रा. भंडारा), लक्ष्मण केळवदे (४५, रा. जवाहरनगर), धम्मानंद रंगारी (४०, रा. भंडारा), अंकित बारई (२०, रा. साहुली), संजय कारेमोरे (३७, रा. खात, जि. नागपूर), जयदीप बॅनर्जी यांचा मृत्यू झाला होता. यांच्या कुटुंबीयांकडून न्यायाची मागणी होत आहे.

# लाडक्या बहिणींना २१०० रुपये कधी देणार? विरोधकांच्या प्रश्नावर अजित दादा म्हणाले....

**मुंबई:** महाराष्ट्राचा अर्थसंकल्प आज राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत मांडला. यावेळी साऱ्यांच्या नजरा या फक्त आणि फक्त लाडक्या बहिणींना सरकारने आश्वासन दिल्याप्रमाणे २१०० रुपये मिळणार का याकडे होतं. मात्र, अजित पवारांना अर्थसंकल्पीय भाषणात त्याबाबतची काहीही घोषणा केलेली नाही. त्यामुळे लाडक्या बहिणी निराश झाल्या आहेत. तर यामुळे सभागृहात विरोधकांनी याबाबत प्रश्न उपस्थित केला. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत २ कोटी ५३ लाख लाभार्थी महिलांना जुलै २०२४ पासून आर्थिक लाभ दिला जात आहे. त्यासाठी आतापर्यंत ३३ हजार २३२ कोटी रुपये खर्च झालेला आहे. २०२५-२६ मध्ये या योजनेसाठी ३६ हजार कोटी रुपये प्रस्तावित आहेत.या योजनेतून मिळणाऱ्या अनुदानाचा उपयोग काही महिला गटांनी आर्थिक उपक्रमासाठी बीज भांडवल म्हणून केला, अशा गटांना आणखी प्रोत्साहन देण्यासाठी विशेष योजना हाती



घेण्याचे विचाराधीन आहे.अजित पवार हे लाडकी बहीण योजनेबाबत बोलत असताना विरोधकांनी २१०० रुपयांबद्दल प्रश्न विचारला. तेव्हा अजित पवार मध्येच थांबून म्हणाले की, जरा बजेट होऊ द्या ना... त्यानंतर त्यांनी आपलं बजेट वाचन सुरु ठेवले.लाडक्या बहिणींना या योजनेच्या माध्यमातून दरमहा १५०० रुपये दिले जात आहेत. मात्र, लवकरच लाडक्या बहिणींना दरमहा १५०० नाही तर २१०० रुपये देऊ असं आश्वासन सरकारने दिलं होतं. त्यामुळे या अर्थसंकल्पात त्याची घोषणा होणे अपेक्षित होतं. मात्र, तसं काहीही झालं नाही. त्यामुळे लाडक्या बहिणी निराश झाल्या आहेत.तर, अजितदादांनी लाडक्या बहिणींसाठी एक मोठी घोषणाही या अर्थसंकल्पात केली आहे. लाडक्या बहिणींसाठी टेक कंपनी मायक्रोसॉफ्टसोबत राज्य सरकार करार करणार असल्याची माहिती त्यांनी दिली. या कंपनीच्या माध्यमातून हजारो महिलांना एआयचे प्रशिक्षण देण्यात येणार असल्याची घोषणा अजित पवारांनी केली. त्याशिवाय अजित पवारांनी विद्यार्थिनींसाठीही काही महत्त्वाच्या घोषणा केल्या आहेत.

# करण जोहरला उच्च न्यायालयाचा मोठा दिलासा



**मुंबई:** निर्माता-दिग्दर्शक करण जोहर या ना त्या कारणामुळे चर्चेत असतो. अनेकदा त्याचे सिनेमे वादात अडकले आहे. पण आता करण जोहरच्या नावाचा वापर केल्यानं एक चित्रपट निर्माता वादात अडकला आहे. ङ्गशादी के डायरेक्टर करण और जोहरफ असं एका सिनेमाचं नाव आहे. या सिनेमाची चर्चा सुरू आहे. पण या चित्रपटाच्या प्रदर्शनाला कोर्टानं स्थिगिती दिली आहे. करण जोहर याच्या याचिकेमुळं उच्च न्यायालयानं ङ्गशादी के डायरेक्टर करण और जोहरफ या सिनेमाच्या प्रदर्शनाला दिलेली स्थगिती शुक्रवारीही कायम ठेवली. स्थगिती उठवण्याची या सिनेमाच्या निर्मात्यांची विनंती न्या. रियाझ छागला यांनी फेटाळून लावली.सिनेमाच्या या नावामुळं करण जोहर यांच्या व्यक्तित्वाच्या हक्कांचे प्रथमदर्शनी उल्लंघन होत असल्याचं स्पष्ट होत आहे. त्यामुळे सिनेमाच्या प्रदर्शनाला यापूर्वी दिलेली अंतरिम स्थगिती उठवता येणार नाहीफ असं न्या. छागला यांनी स्थगिती कायम करताना आदेशात स्पष्ट केलं. अशा नावानं सिनेमा प्रदर्शित केला जात असल्याबद्दल करण जोहर यांनी ङ्गइंडियाप्राइड अडव्हायजरीफ व संजय सिंग आणि लेखक-दिग्दर्शक बबलू सिंग यांच्याविरोधात दावा दाखल केला. त्याविषयीच्या प्राथमिक सुनावणीनंतर न्यायालयानं १३ जून २०२४ रोजी प्रदर्शनाला अंतरिम स्थगिती दिली होती.तसंच करण जोहरनं देखील या सिनेमात माझ्या नावाचा चुकीचा वापर करण्यात आला असून या सिनेमाशी माझा काहीच संबंध नसल्याचं स्पष्ट केलंहोतं. त्यामुळं निर्माते आता सिनेमाचं नाव बदलणार का हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.दरम्यान, करण जोहरच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर करण जोहरनं सैफ अली खान आणि अमृता सिंहचा मुलगा इब्राहिम अली खानला नादानिया या सिनेमातून लॉन्च केलं आहे. हा सिनेमा नुकताच प्रदर्शित झाला आहे. तर गेल्या काही महिन्यांपासून करण त्याच्या कमी झालेल्या वजनामुळंही चर्चेत आहे. त्याचं वजन अचानक कमी झालं असल्यानं चाहत्यांनी त्याला त्याबद्दल विचारायला सुरुवात केली होती. करण जोहरला गंभीर आजार झाल्या असल्याच्या चर्चाही रंगल्या होत्या. मात्र फिटनेसच्या दृष्टीनं वजन कमी केल्याचं सांगितलं.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सावित्रीबाईंचे शैक्षणिक कार्य म्हणजे सामाजिक परिवर्तनाचे माध्यम - प्रा. प्रकाश लहासे...

**जनसंचलन/बुलढाणा**

भारतातील पहिल्या शिक्षिका, मुख्याध्यापिका, स्त्रि शिक्षणाच्या प्रणेत्या, विद्येची जननी, व समस्त स्त्रियांना प्रकाशाची वाट दाखविणा-या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतीदिनानिमित्त श्री सावता शिक्षण प्रसारक व क्रीडा मंडळ, बुलडाणा यांचे वतीने दिनांक १० मार्च २०२५ रोजी मंडळाचे सभागृह राजगुरे ले - आऊट, द्वारका नगर, बुलढाणा येथे अभिवादन करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंडळाचे अध्यक्ष तथा सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी के. टी. पांडव हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. प्रकाश नामदेव लहासे हे उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. या प्रसंगी सावित्रीबाई फुले यांनी स्त्रि शिक्षणाचा मार्ग मोकळा करुन समस्त स्त्रियांना प्रकाशाची वाट दाखविली तसेच त्या अनेक अनिष्ठ प्रथा व परंपरांच्या विरोधात ठामपणे उभ्या राहिल्या असे प्रतिपादन के. टी. पांडव यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून व्यक्त केले. तर सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक कार्य म्हणजे सामाजिक परिवर्तनाचे माध्यम ठरले असे मत प्रा. प्रकाश लहासे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे नियोजन कार्याध्यक्ष गजानन शंकर हुडेकर यांनी केले. मंडळाचे कोषाध्यक्ष डॉ. शिवशंकर गोरे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्यावर व जिवनावर प्रकाश टाकुन कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले तर विनोद संपतराव गायकवाड यांनी



कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या समाजबंधु-भगिनींचे आभार मानले. या कार्यक्रमाला श्रीराम बळीराम लहासे, माधवराव आश्रूबा कांबळे, तुकाराम सखाराम पांडव, आनंदा राजाराम सोनुने, रामराव भावडू हुडेकर, पुरुषोत्तम तुकाराम जाधव, राजाराम लक्ष्मण लहासे, प्रकाश एकनाथ लहासे, सुरेंद्र जनार्दन लहासे, पंकज राजाराम लहासे यांच्यासह बहुसंख्य समाज बंधू भगिनी उपस्थित होत्या.

# गो. से. महाविद्यालयात जागतिक महिला दिन साजरा

**जनसंचलन/ खामगाव**

विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ खामगाव द्वारे संचालित गो. से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय खामगाव येथे ८ मार्च रोजी महिला सक्षमीकरण व महिला उद्योजकता विकास समिती तर्फे जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी माननीय नीताताई बोबडे आणि माननीय आशाताई लहासे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.ङ्कङ्कसामान्यातील असामान्यत्वङ्कङ्क प्रगट करणाऱ्या या दोन्ही प्रमुख अतिथींनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मा.आशाताई लहासे यांनी त्यांची शिक्षणाची जिद्द आणि त्यांच्या समोर आलेले अडथळे यांच्यावर मात करत संधी मिळताच, साथ मिळताच लग्नानंतर पदवी शिक्षण पूर्ण केले..पदरी २ छोटी मुले असताना एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण केली. मंत्रालयात नोकरी मिळाली... पदासाठी पुन्हा एमपीएससी दिली आणि त्यात शारीरिक चाचणी उत्तीर्ण करून मुलाखत उत्तीर्ण केली... परंतु घरासाठी कुटुंबासाठी मुलांसाठी समोर आलेले पद स्वीकारले नाही.ङ्कङ्क त्यांनी त्यांचा गृहिणी ते शिक्षणाची जिद्द हा जीवन प्रवास सर्वांसमोर मांडला.प्रत्येक व्यक्तीला काही ना काही मर्यादा असते. पण संधी येताच आपली स्वप्न पूर्ण करावीत आणि वेळ प्रसंगी आपल्या स्वप्नांना थांबवावं लागलं तरी आयुष्यात निराश होऊ नये पुढील जीवन प्रवास अत्यंत सकारात्मक रीतीने चालू ठेवावा.. अशी शिकवण त्यांच्या मनोगतातून विद्यार्थ्यांना मिळाली. ङ्कङ्कघरातून मिळालेल्या स्वातंत्र्याचा दुरुपयोग न करता त्या स्वातंत्र्याचा जबाबदारीने उपयोग करावा, आपले शिक्षण व्यवस्थेत पूर्ण करावे. आपले ध्येय आधी गाठावे असे मार्गदर्शनही त्यांनी विद्यार्थ्यांना केले.माननीय नीताताई बोबडे यांनी कचऱ्यातून कला कलेतून उद्योग या त्यांच्या प्रकल्पाविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली.. खेड्यातील महिलांना किती वेगवेगळ्या प्रकारे स्वयंरोजगार करणे शक्य आहे याची उदाहरणे दिली. नीता ताईंचे हे कार्य गेल्या २५ वर्षांपासून सातत्याने चालू आहे.प्रत्येक सामान्य माणसात असामान्यत्व असतेच... हे या दोन अतिथींच्या मनोगतातून स्पष्टपणे कळते. आपण त्यांच्यातली जिद्द, सकारात्मकता, इतरांसाठी काही करण्याची तळमळ हे गुण अंगीकारले पाहिजे आणि आपले ध्येय पूर्ण केले पाहिजे,ङ्कङ्कअसे मार्गदर्शन प्राचार्य डॉक्टर धनंजय तळवणकर यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरून बोलताना ते म्हणाले की,ङ्कङ्कतो सर्वात आनंदाचा दिवस असेल जेव्हा महिला दिन साजरा करावा लागणार नाही... महिलांनी आत्मविश्वासी राहून स्वतःला मजबूत केले पाहिजे. कोणाची साथ मिळत नाही याकडे लक्ष न देता, ज्यांची साथ मिळते आहे ते ध्यानात ठेवून मार्गक्रमण करावे. याप्रसंगी प्राध्यापक आढाव सर यांनी सर्व महिला वर्गाला आश्वस्त केले की ते आणि त्यांच्यासारखे सगळे सज्जन आणि सुज्ञ माणसं कायमच महिलांच्या पाठीशी होते, यापुढेही पाठीशी राहतील. कार्यक्रमात लक्ष्मी आणि गायत्री यांनी महिला दिनानिमित्त गायन केले आणि मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी माननीय निताताई बोबडे, माननीय आशाताई लहासे यांचा त्यांच्या कार्याबद्दल सत्कार करण्यात आला. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून शिक्षण घेत मुंबई पोलीस येथे निवड झालेल्या माजी विद्यार्थिनी रविना भिडे हिचाही सत्कार करण्यात आला.

# खाकीतील संवेदनशिलता!
## ठाणेदार दुर्गेश राजपूतांकडून असाही महिला दिनाचा सन्मान!
# विद्यार्थिनी, महिलांसाठी केली बस थांब्यावर आसन व्यवस्था!

**जनसंचलन/ रायपूर**

काल ८ मार्च ला जागतिक महिला दिन सर्वत्र साजरा होत असताना, बुलढाणा तालुक्यातील रायपूर येथे पोलीस स्टेशनचे ठाणेदार दुर्गेश राजपूत यांच्या संकल्पनेतून देखील बस थांब्यावर आसन व्यवस्था उपलब्ध करून महिला दिन साजरा करण्यात आला आहे. ठाणेदार राजपूत यांनी स्वखर्चाने सदर असून व्यवस्था उपलब्ध करून दिली आहे. बुलढाणा तालुक्यातील रायपूर येथील बस स्थानकावर महिला दिनाचे औचित्य साधून रायपूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार दुर्गेश राजपूत यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांनी व महिला यांना रायपूर बस स्थानकावर बसण्यासाठी कोणत्याही प्रकारची आसन व्यवस्था नसल्यामुळे रायपूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार दुर्गेश राजपूत यांनी त्यांच्या स्वखर्चाने आसन व्यवस्था करून दिली.या छोट्याखानी कार्यक्रमाचे उद्घाटन बुलढाणा डीवायएसपी सुधीर पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये जिजाऊ ज्ञान मंदिरच्या विद्यार्थिनींच्या हस्ते फितकापून उद्घाटन करण्यात आले. रायपूर पोलीस स्टेशनने



महिला व विद्यार्थिनी यांना रायपूर बस स्थानकावर आसन व्यवस्था उपलब्ध करून दिल्याने खरा महिला दिन साजरा झाल्याचे बोलल्या जात होते. यावेळी बालाप्रसाद जयस्वाल, हिम्मतराव जाधव प्राचार्य किशोर शिरसाट अनुप अहिर तसेच जिजाऊ ज्ञान मंदिरच्या विद्यार्थिनी व शिक्षिका तसेच रायपूर पोलीस स्टेशनचे कर्मचारी, नागरिक उपस्थित होते.

# जागतिक महिला दिनी महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी बुलढाण्यात विविध कार्यक्रमाचे आयोजन..

**जनसंचलन/बुलढाणा**

जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात देशभरात साजरा केला जातो बुलढाणा शहरातील जागतिक महिला दिन विविध कार्यक्रमांनी साजरा केला जात आहे.. आरोग्य विभाग जिल्हा प्रशासन विभाग पोलीस दल आणि सांस्कृतिक राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांचा सन्मान जिल्हा श्री रुग्णालयात करण्यात आला आहे.. तर महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा या हेतूने जिल्हा परिषदेच्या वतीने सामाजिक न्याय भवन येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते..






दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बुलडाण्यात साकारणार आधूनिक महसूल भवन, १५.७१ कोटी मंजूर !

**जनसंचलन/बुलढाणा**

राज्याच्या अर्थसंकल्पात बुलडाणा विधानसभा मतदार संघाचे शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी बुलडाण्यात महसूल भवन उभारणीसाठी १५.७१ कोटी रुपयांची कामे मंजूर करून घेतली आहेत. मागील पाच वर्षात त्यांनी जिल्ह्यात सर्वात अधिक विकास निधी खेचून आणण्यात यश मिळवले आहे. मतदार संघातील संपूर्ण रस्ते, महामानवांचे पुतळे, स्मारक, शहर सौदर्यकरण, सिचंन, नाटयगृह, वारकरी भवन, आरोग्य भवन, मेडीकल कॉलेज, कृषी महाविद्यालय आदी अनेक विषय पुर्णत्वास नेले आहे. आता दुसऱ्या टप्प्यात पुन्हा निवडूण आल्यानंतर आ. संजय गायकवाड यांनी जिल्ह्यातील महत्वाच्या आणि मोडकळीस आलेल्या इमारतींच्या निर्माण कामांसाठी लक्ष घातले आहे. राज्याच्या अर्थसंकल्पात पहिल्याच दणक्यात आ. गायकवाड यांनी सुमारे १५ कोटी ७१ लाख रुपये सदर इमारतीसाठी मंजूर करुन घेतले आहे. या प्रस्तावित महसूल भवनाच्या उभारणीमुळे जिल्ह्यातील नागरिकांना महसूल संबंधित कामांसाठी सुलभ सेवा मिळण्याची अपेक्षा आहे. महसूल भवनाच्या इमारतीत विविध सुविधा पुरवण्यात येणार आहेत. या इमारती मध्ये आधूनक स्वरुपाची पार्किंग, सेक्युरीटी कॅबीन, शौचालय, तहसीलदार ऑफीस, पहिल्या मजल्यावर नायब तहसीलदार कार्यालय, सेतू कार्यालय, कॉन्फरन्स रुम, दुसऱ्या मजल्यावर एसडीओ कार्यालय, निवडणूक विभाग, कॉप्यूटर रुम, रेकॉर्ड रुम, इव्हीएम स्ट्रांग रुम यांचा समावेश असेल. तिसऱ्या मजल्यावर लॅन्ड रेकॉर्ड कार्यालय, ॲसेंबली हॉल, स्ट्रांग रुम, सीएससी सेंटर, स्टेनो रुम, रेकॉर्ड रुम यांचा समावेश असेल. चौथ्या मजल्यावर कॅन्टींग, किचन, ऑडीटोरीयम, ग्रीन रुम, व्हीआयपी रुम आणि शौचालय यांचा समावेश असेल. आमदार संजय गायकवाड यांनी या मंजुरीसाठी प्रयत्नशील राहून, हा प्रस्ताव यशस्वीरीत्या मंजूर करून घेतला. महसूल भवनाचे उभारणी कार्य लवकरच सुरू होणार असल्याचेही त्यांनी सांगितले. या प्रकल्पामुळे प्रशासन आणि नागरिक यांच्यातील कामकाज सुरळीत होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. यासोबतच, बुलडाण्यातील विकासासाठी आणखी काही प्रकल्प मंजूर करण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरूच ठेवले आहेत. या नव्या महसूल भवनामुळे जिल्ह्यातील प्रशासन अधिक सक्षम आणि कार्यक्षम होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

# केंद्रीय मंत्री जाधवांवर रविकांत तूपकरांनी डागली आरोपांची तोफ!

## पदाचा दुरुपयोग करून जिल्ह्यात दहशत पसरविण्याचा प्रयत्न!

## बारा भानगडी बाहेर काढणार!

**जनसंचलन/बुलढाणा**

केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर टाले यांना तडीपार करण्याचा कट रचला.मी मेहकर मतदार संघात लोकसभा लढवून त्यांच्या बरोबरीत मते घेतल्याचा हा राग असून एसडिओ जोगींवर दबाव टाकत डॉ.टाले यांना तडीपार करण्यात आले आणि या तडीपारी नंतर जाधवांनी आसुरी आनंद घेत पार्टी साजरी केली. जाधव यांना जिल्ह्यात दहशत पसरवायची आहे. परंतु आम्ही घाबरणार नाही. खासदारकीचा व केंद्रीय मंत्री पदाचा कसा दुरुपयोग केला आणि कशा बारा भानगडी केल्या? त्या आता मी बाहेर काढणार आहे.शिवाय योग्य वेळी जाधवांमुळे पिडीत असलेल्या अन्यायग्रस्तांना व शेतकऱ्यांना घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या निवासस्थानी उपोषण करून त्यांना मंत्रिमंडळातून तडीपार करण्याची मागणी रेटणार असल्याचे शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी आज पत्रकार परिषदेत स्पष्ट केले आहे. केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी अनेकांना खोट्या गुन्ह्यात अडकविले आहे. जाधवांच्या दबावाखाली काही अधिकारी कारवाई करतात. अधिकाऱ्यांनाही काही वाटत नाही. ते देखील जाधवांचे चमचे म्हणून काम करतात त्यांचे ही बिऱ्हाड बाहेर काढण्यात येईल असे सांगत तुपकर म्हणाले की, जाधवांना एसपी. एसडीओ,कलेक्टर यांचा चार्ज दिला पाहिजे कारण तेच कारभार चालवतात. सर्वसामान्यांना न्याय मिळत नाही.जाधवांच्या दबावाखाली अशीच कारवाई होत राहिली तर राज्याच्या गृहमंत्रांना आणि सरकारला बदनाम करण्याचा प्रकार म्हणावा लागेल. मेहकर मध्ये त्यांना नवं नेतृत्व नको आहे.कारण त्यांना त्यांच्या मुलाचे राजकीय भविष्य घडवायचे आहे.त्यांनी शिवसैनिकांना मोठे करायला पाहिजे त्यांना स्टॅन्ड करायला पाहिजे पण त्यांनी घरातली मंडळीच मोठी करणे लावली आहे. हजारो कोटींची माया गोळा केली. केंद्रीय मंत्री झाले म्हणून त्यांनी शेतकरी



व नागरिकांची कामे केली पाहिजे मात्र त्यांची दादागिरी आणि दहशत जिल्ह्यात दिसून येत आहे.तुम्ही असे केले तर मी असे करतोहे त्यांना दाखवून द्यायचे आहे परंतु आम्ही घाबरणारे नाही जनतेने सुद्धा घाबरू नये!पुढच्या काळात तर मला मारून टाकायचा आणि माझ्या शिलेदारांना आयुष्यातून उठवायचे, असे षडयंत्र जाधवांचे आहे.परंतु माझ्या व डॉ. टाले किंवा माझ्या शिलेदारांच्या कुटुंबाला धक्का जरी लागला तर जाधव हे जबाबदार राहतील असेही तूपकरांनी पत्र परिषदेत स्पष्ट केले.डॉ. टाले यांच्या तडीपरीला २७ तारखेपर्यंत स्थगिती मिळाली आहे.२७ मार्चला आयुक्तांकडे याप्रकरणी सुनावणी आहे त्यात जो निर्णय होईल तो मान्य राहील असेही रविकांत तुपकर म्हणाले.

# अमानुष प्रवृत्ती विरुद्ध बुलढाण्यात जन आक्रोश!

## स्नेहल ताईला न्याय मिळेपर्यंत रक्षाबंधन साजरे करणार नाही!

**जनसंचलन/बुलढाणा**

निर्दोष रस्त्यावर मारतात..गुन्हेगार मोकाट फिरतात..हे अन्यायाचे राज्य आहे का? बुलढाण्याच्या स्व. स्नेहलचा काय गुन्हा होता? बीडच्या सरपंच स्व. संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या करण्याची अमानुष प्रवृत्ती अशीच बळावणार का? अशा सवालांनी जन आक्रोश मोर्चा गहिवरला! स्व.स्नेहल चौधरीच्या त्रिशरण चौकातील वेदनादायी अपघातात प्रकरणातील आरोपीला व बीडच्या सरपंच देशमूख यांच्या हत्या प्रकरणातील मारेकऱ्यांना अतिक्रुर शिक्षा देण्याच्या मागणीसाठी आज बुलढाणा बंद ठेवून सर्वपक्षीय जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला.दरम्यान स्व. स्नेहलच्या निधनानंतर तिला योग्य न्याय मिळवून द्यावा व बीड हत्या प्रकरणी वाल्मीक कराडसह इतर सर्व आरोपींना भर चौकात अतिक्रूर शिक्षा द्यावी तसेच त्यांच्यावर फास्ट ट्रॅक कोर्टात खटला चालवावा शिवाय बुलढाण्यात स्पीड मीटर बसवावे, मुलींच्या



सुरक्षा संदर्भात उपायोजना कराव्या अशा मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले.यावेळी जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी मोर्चेकरांना आश्वासित केले. यावेळीधर्मवीर युथ फाऊंडेशनचे अध्यक्ष पृथ्वीराजगायकवाड म्हणाले की, जोपर्यंत स्व. स्नेहल ताईला न्याय मिळत नाही तो पर्यंत मी रक्षाबंधन साजरे करणार नाही! तर अनुजा सावळे यांनी स्व.स्नेहल चौधरीचा अपघात करणाऱ्या आरोपीला कठोर शिक्षा व बीड हत्याकांड प्रकरणातील आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी अशी मागणी केली. धर्मवीर युथ फाऊंडेशन महाराष्ट्र तसेच सर्व राजकीय पक्ष, संघटनांच्या वतीने प्रेक्षागार ते जिल्हाधिकारी कार्यालया दरम्यान हा मोर्चा काढण्यात येऊन अमानुष प्रवृत्तीचा निषेध नोंदविण्यात आला. मोर्चात ज्येष्ठ नेते विजय अंभोरे,ओम सिंग राजपूत,गजेंद्र दांदळे,वर्षाताई तायडे,आशिष जाधव, श्रीकृष्ण शिंदे यांच्यासह महाविद्यालयीन विद्यार्थी, विद्यार्थिनी व नागरिकांचा मोठा सहभाग होता. आज सकाळ पासूनच शहरातील सर्वच प्रतिष्ठाने कडकडीत बंद ठेवण्यात आली. शहरात शुकशुकाट जाणवत आहे.

# चिखलीतील युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

**जनसंचलन/चिखली**



भूषण प्रभुलाल पाराशर या २७वर्षीय युवकाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना दि. १० मार्च रोजी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास उघडकीस आली आहे. या युवकाने घरातील स्वयंपाकगृहात गळफास घेऊन जीवन संपविले. आत्महत्येचे कारण कळू शकले नाही. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी दाखल घेऊन पंचनाम करून उत्तरीय तपासणीसाठी मृतदेह उपजिल्हा रुग्णालयात हलविला. मृतक भूषण हा बसस्थानकाजवळील हनुमान मंदिरात पूजा साहित्याची विक्री करायचा, तथापि सोशल मीडिवर ही तो सक्रिय होता. अद्याप त्याच्या आत्महत्येचे कारण अस्पष्ट आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958